| वर्ष - 7 | अंक - 139 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™ गणेशोत्सव

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



www.mahaenews.com | रविवार, दिनांक 24 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मंत्रिपद गौण; प्रश्न सुटले पाहिजे!

## » आमदार महेश लांडगे : वरिष्ठ नेत्यांकडून मिळतेय ताकद

**|पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेली उपयोगकर्ता शुल्काची दंड वसुलीला अखेर स्थगिती मिळाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल आणि तोपर्यंत ही वसुली थांबवावी, असा मोठा निर्णय कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घेतला. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे.**



पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरात वर्षानुवर्षे काही प्रश्न रेंगाळलेले आहेत. हे प्रश्न सोडवून नागरिकांच्या हिताचे निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यासाठी आमदारकीच्या माध्यमातून मी प्रयत्न करत असून सत्तेत असणाऱ्या प्रदेश पातळीवरील वरिष्ठ नेत्यांकडूनही ताकद मिळत आहे. त्या पाठिंब्यामुळे अनेक वर्षांपासून रेंगाळलेले प्रश्न सुटत आहेत. मंत्रीपद केव्हा मिळेल, ही चर्चा माझ्यासाठी गौण आहे. यापेक्षा नागरिकांचे प्रश्न सोडविण्याला मी अधिक महत्त्व देतो असे, प्रतिपादन भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी केले.

श्री गणरायाच्या आरतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी वृत्तपत्राच्या डिजीटल वाहिनीला मुलाखत देताना आमदार लांडगे बोलत होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, वर्षानुवर्षे पिंपरी-चिंचवड शहरवासियांना काही प्रश्न भेडसावत होते. ते प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार आम्ही व्हीजन-2020 अंतर्गत केला. यामध्ये कचऱ्याची समस्या मोठी होती. 1993 पासून 2017-18 पर्यंत शहरातील 25 लाख मेट्रिक टन कचऱ्यावरील प्रक्रियेचा प्रश्न रेंगाळलेला होता. वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पाद्वारे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास सुरूवात केली आहे. या बरोबरच शहरवासियांपुढे पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण होत आहे. आंद्रा, भामा-आसखेड प्रकल्पाच्या माध्यमातून शहरवासियांची तहान भागविण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांच्या डोक्यावर शास्तीची टांगती तलवार होती. 460 कोटी रुपये माफ करण्यासाठी पाठपुरावा केला. एक्झीबीशन सेंटर सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला. रेड झोन ची हद्द निश्चित नसल्याने शहराच्या विकासाला अडथळा येत होता. ही हद्द ठरवून देण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून ती हद्द ठरविण्याबाबत शासनाने आदेश दिले असल्याचे आमदार लांडगे म्हणाले.

### शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा...

» छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्राचा कारभार चालत आहे. छत्रपती संभाजी महाराजांना राज्यासह देशातील तरूण आदर्श मानत आहेत. असे असताना औरंगजेबाचे उदात्तीकरण करून छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान करणारे कृत्य केल्यामुळेच आमदार आझमी यांच्यावर संताप व्यक्त केल्याचे आमदार लांडगे म्हणाले.

### शहराला एज्युकेशन हब बनविण्याचा निर्धार...

» पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांना शहरातच दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बेंगलोर, दिल्ली, चेन्नईसह परदेशात जावे लागू नये, यासाठी शहरच शिक्षणाचे हब करण्याचा निर्धार असल्याचे आमदार लांडगे सांगितले. त्यासाठी शहरात दर्जेदार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, ललित कलासारख्या नामांकित महाविद्यालयाच्या शाखा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याचा पहिला भाग म्हणजे सीईओपी कॉलेजची एक शाखा शहरात सुरू करण्यात येत असल्याचे आ. लांडगे म्हणाले.

# आरतीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये चूलते-पूतण्याचे शक्तिप्रदर्शन!

## » अजित पवार आणि रोहित पवार दाखविणार शक्ती!

**| पिंपरी चिंचवड| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे आमदार रोहित पवार हे आरतीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये शक्तिप्रदर्शन करणार आहेत. रोहित पवार यांनी शनिवारी (२३ सप्टेंबर) रोजी शहरातील ठिकठिकाणच्या गणेश मंडळांना भेटी दिल्या. तर अजित पवार रविवारी (२४ सप्टेंबर) शहरातील सार्वजनिक मंडळांत आरती करणार आहेत. तसेच इतर पक्षांचे नेतेही आरतीच्या माध्यमातून शहरात शक्तिप्रदर्शन करताना दिसतात.**



राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर दोन्ही गटांनी पिंपरी-चिंचवडच्या राजकारणावर जास्त लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या शहराची धुरा राष्ट्रवादीने आमदार रोहित पवार यांच्यावर सोपविली आहे. गणेशोत्सवाचे निमित्त साधत रोहित शहरातील ताकत आजमावत आहेत. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणरायाची आरती शनिवारी त्यांच्या हस्ते केली जाणार आहेत. शहरातील समस्यांकडे नेते, प्रशासन कोणाचेही लक्ष नाही. त्या समस्या सोडविण्यासाठी सत्ताधाऱ्याला बुद्धी देण्याचे साकडे गणरायाला घालण्यासाठी रोहित पवार शनिवारी सायंकाळी शहरातील मंडळाच्या आरती करणार असल्याचे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी सांगितले.

### अजितदादा आज पिंपरी-चिंचवडमध्ये...



» गेल्या वर्षीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक दिवस आरतीचा हा उपक्रम राबविला होता. दिवसभरात ४५ मंडळांच्या गणरायाची आरती केली होती. अजित पवार हे रविवारी सकाळी दहापासून शहरात असणार आहेत. चिंचवडगावातील मोरया गोसावी मंदिरापासून सुरुवात करून पन्नास मंडळांना भेट देणार असल्याचे अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी सांगितले.

# पुण्यात होणार अमृत कलश संकलन!

## » भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची राहणार उपस्थिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर देशभरातून 'मेरी माटी मेरा देश' अभियान राबविण्यात आले. यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) महाराष्ट्र, आणि नेहरू युवा केंद्र संघटन यांच्यावतीने हजारो विद्यार्थ्यांमार्फत महाराष्ट्रात राज्यभरातील महाविद्यालयांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आले.**

आतापर्यंत राज्यभरातील 22 विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. या अमृत कलशाचे एकत्रीकरण 26 सप्टेंबर 2023 रोजी पुण्यात कॉलेज ऑफ इंजिनियरिंग इथे होणार आहे. कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय मंत्री, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

तसेच 22 विद्यापीठांचे कुलगुरू आणि प्रतिनिधीही उपस्थित असतील अशी माहिती मेरी माटी मेरा देशचे प्रदेश संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे. पांडे म्हणाले, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी देशातील शूरवीरांचा गौरव करण्यासाठी आणि शहिदांना आणि हुतात्म्यांना वंदन करण्यासाठी 'मेरी माटी मेरा देश' या अभियानाची घोषणा केली. साऱ्या देशाला कृतज्ञतेच्या आणि एकात्मतेच्या भावनेने



जोडणारे हे अभियान आहे. याअंतर्गत गावागावांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये अमृतवाटिका तयार करण्यात येत आहेत, शिलालेख लावण्यात येत आहेत.

या अभियाना अंतर्गत हजारो हातांनी गोळा केलेली माती प्रतीकात्मक स्वरूपात अमृत कलशामधून जमा करण्यात येत आहे.राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र यांच्यावतीने राज्यातील महाविद्यालयांमधील उपक्रमातून जमा झालेले अमृतकलश प्रातिनिधिक स्वरूपात भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात येत आहे. येत्याकाळात देशभरातून येणारे अमृत कलश दिल्लीमध्ये एकतरी करण्यात येतील आणि त्यातून देशाच्या एकात्मतेचे प्रतीक असलेली अद्वितीय अमृतवाटिका उभी राहणार आहे.

तसेच पुणेकर नागरिकांपर्यंत अभियान नेण्यासाठी शहर भाजपतर्फे एकाच दिवसात घरोघरी जाऊन 38 हजार कुटुंबांकडून अमृतकलशात माती गोळा करण्यात आली होती. या अभियानात आतापर्यंत राज्यभरातील 22 विद्यापीठांनी आपला सहभाग नोंदवला आहे. यात 1517 महाविद्यालयांनी 4176 गावांतून 3414 अमृत कलश गोळा केले आहेत. तर, विविध ठिकाणी 1164 अमृत वाटिका आणि 787 शिलफलक स्थापित केले आहेत. शाळा, कॉलेज, गावे, स्मारके अशा 3344 ठिकाणी नागरिकांना पंचप्रण ची शपथ विद्यार्थ्यांमार्फत देण्यात आलेली आहे. या अभियानाचा विश्वविक्रम व्हावा यासाठी 'सेल्फी विथ मेरी माटी' हा उपक्रम देखील एनएसएस द्वारे राबवला गेला. यात 57088 लोकांनी आपला माती सोबतच सेल्फी आपलोड करून अभियानात भाग घेतला आहे.

### घरोघरी जाऊन माती गोळा करण्यात आली

» या अभियाना अंतर्गत हजारो हातांनी गोळा केलेली माती प्रतीकात्मक स्वरूपात अमृत कलशामधून जमा करण्यात येत आहे.राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र यांच्यावतीने राज्यातील महाविद्यालयांमधील उपक्रमातून जमा झालेले अमृतकलश प्रातिनिधिक स्वरूपात भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात येत आहे. येत्याकाळात देशभरातून येणारे अमृत कलश दिल्लीमध्ये एकतरी करण्यात येतील आणि त्यातून देशाच्या एकात्मतेचे प्रतीक असलेली अद्वितीय अमृतवाटिका उभी राहणार आहे. तसेच पुणेकर नागरिकांपर्यंत अभियान नेण्यासाठी शहर भाजपतर्फे एकाच दिवसात घरोघरी जाऊन 38 हजार कुटुंबांकडून अमृतकलशात माती गोळा करण्यात आली होती.

# गणेश विसर्जनासाठी मनपाची जय्यत तयारी!

## » विसर्जन घाटांवर 130 खासगी जीवरक्षकही तैनात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशोत्सवातील पाचव्या दिवशी होणाऱ्या घरगुती गणेश विसर्जनासाठीची महापालिकेची तयारी पूर्ण झाली आहे. सार्वजनिक स्वच्छता, मिरवणूक मार्गावरील स्वच्छता, औषधोपचार व्यवस्था, कीटकनाशक फवारणी, विसर्जन घाटांवरील कर्मचारी व्यवस्थापन, जीवरक्षकांच्या नियुक्त्या, सुरक्षा यंत्रणेची कामे पूर्ण झाली आहेत. विसर्जनासाठी अस्तित्वातील हौदांची दुरुस्ती करण्यात आली असून, रंगकाम पूर्ण झाले आहे. रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असून, रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले आहेत.**



### जलस्त्रोतांच्या ठिकाणी नियंत्रक कठडे

» विसर्जन घाटांवर अग्निशमन दल आणि जीवरक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रभाग अधिकारी, आरोग्य निरीक्षक, मुकादम, विद्युत विभागातील कर्मचारी यांना स्वतंत्रपणे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. गणेश मूर्ती संकलन आणि दान केंद्रांची व्यवस्थाही क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात आली आहे. नदी आणि नैसर्गिक जलस्त्रोतांच्या ठिकाणी धोका नियंत्रक कठडे उभारण्यात आले आहेत.

विसर्जन घाटांवर अग्निशमन दल आणि जीवरक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रभाग अधिकारी, आरोग्य निरीक्षक, मुकादम, विद्युत विभागातील कर्मचारी यांना स्वतंत्रपणे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थेची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. गणेश मूर्ती संकलन आणि दान केंद्रांची व्यवस्थाही क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात आली आहे. नदी आणि नैसर्गिक जलस्त्रोतांच्या ठिकाणी धोका नियंत्रक कठडे उभारण्यात आले आहेत. अग्निशमन दलाकडून १८ विसर्जन घाटांवर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जवानांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १३० खासगी जीवरक्षकही तैनात करण्यात आले आहेत. रात्रपाळीत काम करणाऱ्या जीवरक्षकांना फ्लोरोसेन्ट जॅकेट्स देण्यात आले असून नदी किनारी सुरक्षेच्या दृष्टीने दोरखंड लावण्यात आले आहेत. अग्निशमन दलाची बिनतारी संदेश यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे. भाविकांनी निर्माल्य शहरात इतरत्र, पुलांवर किंवा कोणत्याही जलप्रवाहात न टाकता स्वच्छ संस्थेच्या कचरावेचकांकडे द्यावे, असे आवाहन स्वच्छ संस्थेकडून करण्यात आले आहे. औंध गाव (राजीव गांधी पूल), शांता आपटे घाट, अब्दुल कलाम जलतरण तलाव, महादेव घाट, वाकेश्वर मंदिर गणपती घाट पाषाण, सोमेश्वरवाडी गणपती घाट पाषाण, एस एम जोशी पूल, ओंकारेश्वर (भिडे पूल), कात्रज तलाव, शाहू उद्यान जलतरण केंद्र, संगम घाट हौद आणि नदीपात्र, कात्रज घाट, थोरवे शाळा, भारती विद्यापीठजवळ, तुळशीबागवाले कॉलनी मैदान, धनकवडी टपाल कार्यालय, मुंढवा पूल, साईनाथनगर, वडगाव शेरी जुना घाट, वडगाव शेरी नवा घाट, इंदिरानगर पोलीस चौकी या ठिकाणी कचरावेचकांची नियुक्ती केली जाणार आहे.

# येरवड्यातील कैद्याच्या अधिकाऱ्यांच्या हातावर तुरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

येरवडा मध्यवर्ती कारागृहात खूनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या एका कैद्याने कारागृहातील अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करुन तसेच मनी ऑर्डर रजिस्टरमध्ये फेरफार करुन तब्बल 26 लाख 69 हजार रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी सचिन रघुनाथ फुलसुंदर नामक कैद्याविरोधात येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत येरवडा कारागृहाचे तुरुंगाधिकरी बापुराव भिमराव मोटे (38) यांनी आरोपी विरोधात पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. सचिन फुलसुंदर हा कैदी 2006 मधील बलात्कार व खूनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील आरोपी आहे. या प्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. येरवडा कारागृहात बंदिस्त असताना त्याने फेब्रुवारी 2021 ते ऑगस्ट 2023 यादरम्यान त्याने कारागृहातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नजर चुकवून कारखाना विभागात तयार होणाऱ्या वस्तू बाहेर पाठवण्याचे मदतीचा बहाणा केला. त्याने सदर विभागात वारंवार येऊन तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला. येरवडा कारागृहातील 2 ए रजिस्टर (कैद्यांना त्यांचे नातेवाईकांनी केलेल्या मनी ऑर्डर) क्रमांक 1 ते 6 मध्ये त्याने फेराफार केला. कारागृह अधिकाऱ्यांच्या हुबेहुब खोट्या सह्या, दिनांक, खोटे हिशेब तयार करुन मोघम रक्कमा स्वत:च्या व इतर कैद्यांच्या नावे दाखवून सदर रक्कम परस्पर वापरली. याद्वारे त्याने अंदाजे 26 लाख 69 हजार 911 रुपयांचा अपहार करत फसवणूक केली. या प्रकरणानंतर येरवडा कारागृह प्रशासन खडबडून जागे झाले. यापुढे मनी ऑर्डरची सगळी हस्तलिखित कामे बंद करुन 'ई-प्रिझन' सॉफ्टवेअरच्या सहाय्याने कामे करण्याचे आदेश पोलिस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी दिले आहेत.

# गुन्हेगारी रोखण्यासाठी “विघ्नहर्ता” !

## सुरक्षेसाठी 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे : आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला प्रकल्प आढावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील नागरिकांची सुरक्षा, गुन्हेगारी आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी आणि महानगरपालिकेच्यावतीने शहरामध्ये विविध ठिकाणी सुमारे ५ हजारहून अधिक कॅमेरे लावण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमे-यांचा पोलीस प्रशासनाला मोठया प्रमाणात फायदा होत असून गुन्हयांचा छडा लावण्यात यश येत आहे. वाहतुकीचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांवर देखील याचा वचक बसून वाहतुक व्यवस्था सूरळीत ठेवण्यात मदत होणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. तसेच, बीआरटी मार्गात नियमबाहय वाहने चालविणा-यांवर देखील बंदी घालण्यासाठी १० बीआरटी मार्गांवर लेन व्हायलेशन डिटेक्शन कॅमेरे बसविण्यात आले आहे. तसेच, सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलिसांना ३५० हून अधिक गुन्हांचा तपास लावण्यात मदत झाल्याचेही त्यांनी सांगितले.**



निगडी येथील आयसीसीसी सेंटर येथे आज, दि. २२ रोजी आयुक्त शेखर सिंह यांनी स्मार्ट सिटीमार्फत सूरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. तसेच, प्रकल्पांबाबत माहिती घेवून केंद्र शासनाने आखून दिलेल्या तारखेपर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. यावेळी, शहर अभियंता मकरंद निकम, सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, सह शहर अभियंता मनोज सेठीया, बाबासाहेब गलबले, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे यांच्यासह प्रकल्प सल्लागार तसेच ठेकेदार कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत सूरू असलेले अनेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत. तर काही प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. ही सर्व विकास प्रकल्प शहराच्या नाव लौकिकात भर घालणारी नक्कीच ठरतील. मात्र, विकास प्रकल्प सूरू असताना अनेक समस्यांचा सामना प्रशासनाला करावा लागतो. त्यामुळे विकासात बाधा निर्माण होते. अशा समस्या निर्माण करणा-या मानसिकतांना वेळीच आवर घाला, असे सांगून विकासात आळा घालणा-यावर पोलीसात गुन्हे दाखल करा, अशा सूचना देखील त्यांनी अधिकार-यांना यावेळी दिल्या. दरम्यान, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन थांबविण्यासाठी व्हिडिओ आधारित गती उल्लंघन शोध प्रणालीची माहिती आयुक्त सिंह यांनी जाणून घेतली.

### पब्लिक एड्रेस सिस्टीम...

पब्लिक अॅड्रेस सिस्टीम (पीए सिस्टीम) ही मायक्रोफोन, अॅम्प्लिफायर आणि लाउडस्पीकर असलेली इलेक्ट्रॉनिक ध्वनी प्रवर्धन वितरण प्रणाली आहे. ज्याचा वापर जनतेला संबोधित करण्यासाठी केला जातो. शहरात १० ठिकाणी माहिती प्रसार प्रणालीचा भाग म्हणून पीए सिस्टीम आधारित सार्वजनिक हिताच्या घोषणा करण्यासाठी या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. ही प्रणाली आयसीसीसी सेंटरमधून व्यवस्थापित आणि नियंत्रित करण्यात येईल.

### गाडयांचे नंबर प्लेट ओळखणार कॅमेरा...

एएनपीआर कॅमेरा हा नंबर प्लेट ओळखणारा कॅमेरा आहे. या कॅमेऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो वाहनांच्या नंबर प्लेट वाचून आपोआप चलन काढणे. एवढेच नाही तर कमांड कंट्रोल रूममध्ये बसलेले पोलीस या कॅमेऱ्याच्या मदतीने रस्त्यावर लक्ष ठेवून नियम मोडणाऱ्यांना चलन देऊ शकतात. एएनपीआर कॅमेरा गुन्हेगारांची छायाचित्रे घेतो आणि त्यात बसवलेल्या सॉफ्टवेअरच्या मदतीने गुन्हेगारांचे तपशील जवळपास तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पाठवतो. याव्यतिरिक्त, ANPR कॅमेरे अॅक्सेस कंट्रोल सिस्टम स्वयंचलित करू शकतात. सुरक्षा प्रदान करू शकतात, कार चोरीला प्रतिबंध करू शकतात, विमा नसलेली वाहने शोधणे आणि वाहनांचे निरीक्षण, बेकायदेशीर पार्किंग तसेच वाहतूक व्यवस्थापन सुव्यवस्थित करू शकतात.

### कॅमे-यांद्वारे वाहतुकीच्या वेगाची होणार नोंद...

वाहतुकीच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पीड व्हायलेशन डिटेक्शन सिस्टम सिंक्रोनाइज अवलंब करण्यात आला आहे. शहरात १६ ठिकाणी हे कॅमेरे लावण्यात आले असून सिग्नल ओलांडलेल्या वाहनांची नंबर प्लेट आणि वेग पकडण्याची क्षमता या प्रणालीमध्ये आहे. अतिवेगवान वाहनासाठी स्वयंचलितपणे अलार्म निर्माण करण्यास सिस्टीम सक्षम आहे. तसेच, वाहतुकीचे उल्लंघन केलेल्या वाहनाचा व्हिडिओ पुरावा कॅमेरा युनिट द्वारे कॅप्चर केला जाणार आहे. पुढे, एएनपीआर सिस्टीम कॅप्चर केलेल्या प्रतिमेवर प्रक्रिया करेल. त्यास अल्फान्यूमेरिक मजकूर/क्रमांकात रूपांतरित करून ई-चलन जारी करण्यासाठी त्याचा वापर केला जाईल. याव्यतिरिक्त, उल्लंघनकर्त्यांची माहिती स्थानिक पातळीवर प्रदर्शित केली जाते.

### रेड लाइट व्हायलेशन डिटेक्शन सिस्टम...

शहरातील २३ ट्रॅफिक जंक्शनवर लाल सिग्नलचे उल्लंघन रोखण्यासाठी ही प्रणाली तयार करण्यात आली आहे. याद्वारे लाल सिग्नलचे उल्लंघन करणार-या वाहनांचा फोटो घेवून त्याचे चलन तयार होईल. यामुळे, सिग्नलवरील झेब्रा क्रॉसिंगचे उल्लंघन थांबण्यास मदत होईल. लाल सिग्नलवरील सिस्टीमच्या कॅमेरेद्वारे या सिग्नलवरील नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनांच्या नंबर प्लेटची नोंद घेवून संपूर्ण डेटा संकलित केला जाईल. सिग्नल, क्रॉसरोड आणि यू-टर्न वाहतूक पोलिसांशिवाय चालतील. पिंपरी चिंचवडमध्ये पहिल्यांदाच हा प्रयोग सुरू होणार आहे. इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत वाहतूक व्यवस्था बदलण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. योजनेनुसार शहरात सीसीटीव्हीसह चार प्रकारचे विशेष कॅमेरे बसविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे लाल सिग्नलवर वाहनांच्या गर्दीनुसार लाईटची वेळ आपोआप सेट होईल.

# महावितरणच्या आकुर्डी, भोसरी विभागाचे होणार विभाजन

## भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांतील वीज ग्राहकांना दिलासा

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांसह औद्योगिक पट्ट्यातील वीज समस्या आता निकालात निघणार आहे. महावितरण प्रशासनाकडून आकुर्डी व भोसरी उपविभागाचे विभाजन भोसरी-1 आणि भोसरी- 2 असे करण्यात येणार आहे. तसेच, तीन नवीन शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार आहे. या प्रस्तावाला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे.**




त्यामुळे भोसरी मतदार संघातील वीज समस्या सोडवण्यासाठी वीज ग्राहकांना ऐन गणेशोत्स्वात ‘गणपती बाप्पा पावला’ आहे. महावितरण संदर्भातील प्रस्तावित वीज विषयक कामांसाठी व निधी मिळणेबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी वारंवार पाठपुरावा केला होता. जुलै-2023 मध्ये मुंबई येथे झालेल्या विधानसभा अधिवेशनामध्ये लांडगे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला आता यश मिळाले आहे.

महावितरणच्या भोसरी विभागांतर्गत औद्योगिक व घरगुती असे सुमारे 3 लाख 70 हजार वीजग्राहक आहेत. एका शाखा कार्यालयांतर्गत 16 तांत्रिक कर्मचारी सुमारे 40 ते ६० 60 हजार ग्राहकांना सेवा अखंडित वीज सेवा देण्यासाठी कार्यरत असतात. ग्राहक संख्या जास्त असल्यामुळे वीजसमस्या आणि तांत्रिक अडचणींच्या तक्रारी वाढल्या आहेत. भौगोलिक कार्यक्षेत्र आणि वीज मागणी याचा विचार करता भोसरी गाव व आकुर्डी विभागाचा काही भाग असे विभाजन करुन नव्या उपविभागाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, स्पाईन सिटी, इंद्रायणीनगर आणि चिखली शाखा कार्यालयांची स्थापना करण्यात येणार आहे.

### वीज विषयक पायाभूत सुविधा निर्मितीचा संकल्प

आमदार लांडगे म्हणाले की, समाविष्ट गावांतील वीज समस्या सोडवण्यासाठी वीज उपकेंद्र उभारण्याचा निर्णय घेतल्यामुळे वर्षभरात हे इन्फ्रास्ट्रक्चर निर्मिती होईल. त्यामुळे नवीन विकसित भागातील वीज पुरवठा सक्षम होईल. यासोबतच सध्या या भागातील वीज पुरवठ्याचा अतिरिकत भार गावठाण भागांवर होत आहे. तो कमी होणार असल्यामुळे गावठाण आणि समाविष्ट भाग असे दोन्ही परिसरात वीज पुरवठा सुरळीत आणि सक्षम होणार आहे. कारण, पायाभूत सुविधांसह आता अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, आगामी 50 वर्षांतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून वीज विषयक पायाभूत सुविधा निर्मिती करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. त्याला यश मिळत असल्याचे समाधान आहे.




# शाळा देणगीदाराच्या नावे करणे योग्य ?

**राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी ५ सप्टेंबर रोजी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' समारंभात चक्क शिक्षक दिनीच राज्यातील शाळा कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना दत्तक देण्यासंदर्भात मत व्यक्त केले राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या सुमारे ६२ हजार शाळांसाठी 'दत्तक शाळा योजने'ला मंजुरी दिली.**



'गुणवत्तापूर्ण शिक्षण' या गोंडस नावाखाली शासन शिक्षणाच्या जबाबदारीतून हात तर झटकत नाही ना, अशी शंका राज्यातील नागरिकांच्या मनात घर करून आहे. शिक्षणाच्या जबाबदारीचे ओझे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला झेपत नाही का, हा प्रश्न या निमित्ताने अधोरेखित झाला आहे. याच दरम्यान शासनाने महाराष्ट्रातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी तब्बल चोवीसशे कोटींचा निधी मंजूर केला. दत्तक शाळा योजना आणि मंदिरांना कोटींचा निधी या दोन्ही शासन निर्णयांमधून शासनाला नेमके कशाला प्राधान्य द्यायचे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून मंदिर विरुद्ध ज्ञानमंदिर असे चित्र उभे करायचे नाही. मात्र मंदिराइतकेच (खरेतर मंदिरापेक्षा अधिक) प्राधान्य ज्ञानमंदिराला दिले पाहिजे अशी महाराष्ट्राचा एक नागरिक या नात्याने अपेक्षा ठेवणे नक्कीच अनाठायी ठरणार नाही. या निमित्ताने कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रकर्षाने आठवण येते. शाळेला असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव बदलणार नाही, म्हणत देणगी नाकारणाऱ्या कर्मवीरांच्या महाराष्ट्रात शिक्षणाची जबाबदारी झटकत गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मृगजळ दाखवून शाळा खासगी कंपन्यांना देण्याचा निर्णय शासन कसा काय घेऊ शकते, असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. दत्तक शाळा योजनेला सर्व शिक्षक संघटनांचा विरोध आहे. शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांचा लक्षवेधी निषेध राज्यात सुरू झाला आहे. सामान्य नागरिकसुद्धा हा निर्णय मागे घेण्याची मागणी करत आहेत. सरकारने या निर्णयाचा फेरविचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची आर्थिक तरतूद राज्याच्या विकासाची खरी गुंतवणूक असते. ही गुंतवणूक सरकारला अनावश्यक खर्च वाटत असेल, तर ते योग्य नाही. दत्तक शाळा योजनेच्या माध्यमातून 'शाळांच्या भौतिक सुविधांसाठी शासन यापुढे निधी देऊ शकणार नाही' असे तर सांगायचे नाही ना? जर असे असेल तर येत्या काळातील शैक्षणिक भवितव्याची कल्पनाच न केलेली बरी आहे. आपला मंदिरांना विरोध नाहीच. आत्मिक समाधानासाठी मंदिरे असावीत. मात्र आत्मबल मजबूत करून जीवनाचा पाया रचणाऱ्या ज्ञान मंदिरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हेही नाकारता येणार नाही, याची जाणीव ठेवावी लागेल. मंदिरांना सोन्याचा कळस मिळाला तरी हरकत नाही मात्र ज्ञानमंदिराचे किमान छप्पर तरी गळू नये, याची काळजी तर शासनाने घेतलीच पाहिजे. मंदिरात कितीही मोठी देणगी दिली तरी देणगीदारचे फक्त नाव देणगीदारांच्या यादीमध्ये मोठ्या अक्षरात लिहिले जाते, मात्र इथे तर चक्क शाळांची नावे बदलण्यास सरकारने परवानगी दिली आहे. शिक्षणाचे हे बाजारीकरण शाळांच्या जीवावर उठणार नाही याची हमी सरकार तरी देऊ शकणार आहे का? सरकारी शाळांना खासगी कंपन्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत असेल तर स्वागतच आहे, मात्र ज्या पद्धतीने व्यवहार मांडला जात आहे ती पद्धत नक्कीच व्यवहार्य नाही. देणगीदाराचे नाव शाळेच्या कार्यालयात दर्शनी भागावर मोठ्या अक्षरांत लिहायला हरकत नाही. मात्र शाळाच देणगीदाराच्या नावावर करणे कितपत योग्य आहे, हे आताच ठरवावे लागेल. भक्तांची देवावर फार श्रद्धा असते. कुणाची कुणावर श्रद्धा असावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. खरे भक्त तर मंदिरांना दान देताना मागेपुढे पाहत नाहीत. मोठमोठी रक्कम मंदिरांना देणगी स्वरूपात देतात. एकीकडे मंदिरामध्ये अभिषेक, महाप्रसाद वा अन्नदानाची पावती फाडण्यासाठी भक्तांची मोठी रांग लागलेली असते तर दुसरीकडे शिक्षक शाळेसाठी देणगी मागत गावात फिरतात तेव्हा बहुतेकदा रिकाम्या हातांनीच माघारी परतण्याची वेळ त्यांच्यावर येते. याचे बोलके उदाहरण काही वर्षांपूर्वी अकोला जिल्ह्यात पहायला मिळाले. इयत्ता पहिली ते आठवीच्या एका जिल्हा परिषद शाळेतील आठ वर्ग केवळ एका खोलीत बसत. शिक्षकांनी शाळेसाठी भाड्याने गावातील खोल्या घेण्यासाठी 'शैक्षणिक उठाव' (देणगी) गोळा करण्याचा प्रयत्न केला तर शाळा इमारतीसाठी जेमतेम १५०० रुपये जमले होते.

## संपादकीय »

### दुर्गा हो गं गौरी..

*माहेर म्हणजे तिचे स्वत:चे घर. पण तिथे ती तीन दिवसांची पाहुणीच. तिथल्या काडीवर तिची सत्ता नसते. लाडकोड करून घ्यायचे आणि आपला रस्ता सुधारायचा..*

गणपतीपाठोपाठ दोन दिवसांनी गौरीचे आगमन होते. गौर म्हणजे साक्षात माहेरवाशीण. ती आपल्यासोबत चैतन्य घेऊन येते. अगदी सोन्याच्या, मोत्याच्या पावलांनी येते. साडय़ा, दागदागिने, पुरणावरणाचा स्वयंपाक करून या लाडक्या लेकीचे सगळे लाडकोड पुरवले जातात. तिच्यामुळे घरदारातले वातावरण जिवंत, रसरशीत झालेले असते. म्हणजे ती सगळय़ांनाच हवी तर असते, पण तिसऱ्या दिवशी डोळय़ातले पाणी पुसत का होईना, तिची पाठवणी केली जाते. आणखी एखादा दिवस तिला राहायचे असेल तर काय, हा विचारही कुणाच्या मनात येत नाही. माहेर म्हणजे तिचे स्वत:चे घर. पण तिथे ती तीन दिवसांची पाहुणीच. तिथल्या काडीवर तिची सत्ता नसते. केले जातील ते लाडकोड करून घ्यायचे आणि आपला रस्ता सुधारायचा..

**अलीकडे पोलिसांच्या वाहतूक खात्यातले एक ज्येष्ठ अधिकारी भेटायला आले होते. वाढती वाहतूक, प्रदूषण, अशात गर्दीच्या ठिकाणी १२-१२ तास उभं राहून वाहतूक पोलिसांना किती अवघड परिस्थितीत काम करावं लागतं वगैरे बोलणं सुरू होतं. हे अधिकारी ठाण्यातले. म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या शहरातले. मग किती मोठा जिल्हा आहे हा.. एका बाजूने पालघरला धरून गुजरातला चिकटलेला.. नगर.. नाशिक अशी आपली चर्चा सुरू होती.**

## पोलिसांना किती अवघड परिस्थितीत काम करावं लागतं



वाहतूक व्यवस्थापन या जिल्ह्यात किती कठीण आहे, हे ते सांगत होते. कारण जेएनपीटी बंदरात जाणारी-येणारी वाहतूक, गुजरातला जोडणारा महामार्ग, इकडे मुंबई-आग्रा रस्ता आणि परत मुंबईचा शेजार अशी सगळीच आव्हानं. सरासरी वाहनांची संख्या चक्रावून टाकणारी. हे सगळं ते सांगत होते. पण खरा धक्का त्यांच्या एका विधानानं बसला. ते म्हणाले.. "अहो हे सगळं ठीक. पण आमची पंचाईत अशी की इतके हमरस्ते, महामार्ग असूनही मद्य पिऊन गाडी चालवतंय का कोणी ते तपासण्यासाठी आवश्यक 'ब्रेथ ॲनालायझर' अख्ख्या जिल्ह्यासाठी मिळून फक्त एक आहे आमच्याकडे.." खरं तर हे सांगण्यासाठी काही ते आलेले नव्हते. बोलता बोलता विषय निघाला आणि ते बोलून गेले. संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी फक्त एक ब्रेथ ॲनालायझर..? मला खरंच वाटेना. मी तीन तीनदा खातरजमा केली. ते तेच म्हणत होते. त्यांना हेच म्हणायचंय हे नक्की झाल्यावर विचारलं एकच एक ब्रेथ ॲनालायझर का? आणखी नकोत ते? खरं आहे.. निधीची कमतरता आहे म्हणून आमच्या या गोष्टींवर गदा येते, असं हे अधिकारी सांगत होते. वास्तविक येता-जाता, टोल नाक्यांवर वगैरे दोन-चार ठिकाणी वाहतूक पोलिसांहाती ब्रेथ ॲनालायझर अनेकदा दिसले होते. पण हे तर म्हणतात संपूर्ण जिल्ह्यासाठी म्हणून एकच एक, तर हे कसं, असं त्यांना विचारलं. या प्रश्नानं त्यांना जराही आश्चर्य वाटलं नाही. त्यांच्या मते हे दोन्हीही तितकंच खरं. त्याचं स्पष्टीकरण त्यांनी दिलं. ते मूळ मुद्द्यापेक्षाही धक्कादायक होतं. तर वरिष्ठ पोलीस अधिकारी आपलं 'वजन' वापरून परिसरातले व्यापारी, इस्पितळं, उद्योगपती यांना गाठतात आणि बिचाऱ्या पोलिसांसाठी अशा आवश्यक त्या काय काय देणग्या मिळवतात. कोणी छत्र्या देतं, कोणी रस्त्याच्या कडेला सावलीतला आसरा बांधून देतं तर कोणी पोलिसांना ब्रेथ ॲनालाझर वा ते खरीदण्यासाठी आवश्यक ते पैसे देतात. त्यावर आठवलं एकदा पासपोर्टच्या कामासाठी पोलीस चौकीत जावं लागलेलं तर तिथेही काही वस्तू कोणाकोणाच्या सौजन्याने वगैरे 'मिळालेल्या' होत्या. म्हणजे सद्रक्षणाय वगैरे बिरुद मिरवणाऱ्या पोलिसांच्या रक्षणार्थ खासगी दातृत्व असं मदत करतं. त्यावर त्या पोलीस अधिकाऱ्याला विचारलं.. जे तुम्हाला देणग्या देतात त्यांच्याविरोधात कोणाची कसली तक्रार आली तर तुमच्यावर त्या देणगीदाराच्या उपकाराचं ओझं असणार.. मग कशी काय चौकशी/तपास करणार तुम्ही त्यांच्या विरोधात.? कसंनुसं हसले ते. लक्षात आलं हा मुद्दा फार काही ताणण्यात अर्थ नाही. आणि दुसरं म्हणजे हे एकटे अधिकारी तरी काय करणार? यांच्याबाबत सगळं 'वरनं' येतं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नागपुरात पावसामुळे हाहाकार!

## » वृद्ध नागरिकांना सर्व ती मदत तातडीने द्या : देवेंद्र फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नागपुरात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळाले. रात्री विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाल्याने शहरातील अनेक भागात नागरिकांच्या घरात पाणी शिरले. मोर भवन परिसरात पाणीच पाणी जमा झाले. बस स्थानकावरील बस पाण्यात बुडाल्या. एका रात्रीत 106 मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.**

एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चमूंनी आतापर्यंत 400 नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले आहे. तर पावसामुळे एक महिला मृत्य झाला आहे. मुक-बधीर विद्यालयातील 40 विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. नागपूर शहराच्या विविध भागात 2 एनडीआरएफ चमू बचाव कार्यात आहेत. अग्निशमन दल सुद्धा मदत कार्यात आहे. अंबाझरी परिसरात लष्कराच्या 2 तुकड्या बोलावल्या आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. नागपूरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखोल भागात पाणी शिरले असून नागलवाडी, अंबाझरी कार्पोरेशन कॉलोनी मधील अनेक घरात पाणी शिरले आहे. हवामान विभागाने नागपुरात आधीच ऑरेंज अलर्ट दिला होता. वास्तविक येथे अद्यापही पावसाची रिपरिप सुरूच



आहे. त्यामुळे प्रशासनाने शाळा, महाविद्यालयांना सुटी जाहीर केली आहे. हवामान विभागाच्या वतीने वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार शुक्रवारी विदर्भात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज होता. त्यानुसार शुक्रवारी दिवसभर नागपूरमध्ये पाऊस सुरूच होता. मात्र, सायंकाळनंतर या पावसाची तीव्रता अधिकच वाढल्याने अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाला. नागपूरमध्ये गेल्या 24 तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली असून अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेक वाहने आणि घरातील सामना पाण्यामुळे पूर्णपणे बुडाले होते. सायंकाळपासून सुरू झालेल्या पावसामुळे अनेक भागात पाणी साचण्यास सुरूवात झाली होती. त्या मुळे जिल्हा प्रशासन तातडीने कामाला लागले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या बाबत आवश्यक त्या उपाय-योजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एनडीआरएफची एक आणि एसडीआरएफच्या दोन तुकड्या बचाव आणि मदत कार्यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत. नागपुरात काल रात्री मुसळधार पावसामुळे अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाल्याने काही भागात पाणी शिरले आहे. अवघ्या 4 तासात 100 मिमीपेक्षा अधिक पाऊस झाल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी मला दिली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नागपूर जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त हे घटनास्थळी पोहोचले असून तातडीने आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. सखल भागात अडकलेल्या नागरिकांना आधी तातडीने मदत करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. एनडीआरएफची एक आणि एसडीआरएफच्या 2 चमू बचाव कार्यात तैनात करण्यात आल्या आहेत.

### घराबाहेर न पडण्याचे आवाहन

» जोरदार पावसामुळे नागपूरमधील शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. तसेच नागरिकांनी घराच्या बाहेर न पडण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे मनपाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी तसेच रस्त्यांवर पाणी जमा झाले आहे. नदी नाल्यांमध्ये पाणी वाढत असल्यामुळे पूल ओलांडू नये. पाणी कमी झाल्यानंतरच पूल ओलांडावा, असेही आवाहन प्रशासनाने केले आहे.

# कपाळाला कपाळ घासून यश मिळत नाही : शिंदे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या आधीच आमदार रोहित पवार भाजपत जाण्याच्या तयारीत होते, असा गौप्यस्फोट केला होता. या वक्तव्याला भाजप आमदार राम शिंदे यांनी दुजोरा देत आमदार रोहित पवारांवर निशाणा साधलाय. आमदार रोहित पवारांनी त्यांच्या आयुष्यातले पहिले राजकीय तिकीट ब्लॅकमेल करूनच मिळवल्याचे भाजपचे आमदार प्रा. राम शिंदे यांनी म्हंटले आहे.दरम्यान आमदार राम शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, रोहित पवार हे भाजपाच्या तिकिटासंदर्भात तत्कालीन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याकडे हडपसर आणि शिवाजीनगर विधानसभेचे तिकिट मिळवण्यासाठी गेले होते. 2017 साली त्यांनी राष्ट्रवादीला धमकी दिली होती. जिल्हा परिषदेचे तिकिट देता की, मी भाजपात जाऊ. तसेच रोहित पवार यांनी 2019 साली हडपसरसाठी भाजपकडे तिकिट मागितले होते. राम शिंदे म्हणाले की, अजित पवार हे गेल्या 30 वर्षांपासून राजकारणात आहेत, रोहित पवारांकडे तेवढे मेरिट आणि क्षमता आहे का? असा सवाल राम शिंदे यांनी विचारला आहे. तर कोणाच्या कपाळाला कपाळ घासून यश मिळत नाही असा खोचाक सल्लाही त्यांनी रोहित पवार यांना दिला आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटाकडून रोहित पवारांवर जोरदार टीका सुरू आहे. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी रोहित पवारांवर टीका करताना ते कितीही जन्म घेवोत, त्यांना अजित पवार होता येणार नाही असे म्हटले होते. त्यावर आमदार रोहित पवारांनी प्रत्युत्तर देताना म्हटले होते की, अजित पवार हे राज्याचे मोठे नेते आहेत.

# खडसे-चंद्रकांत पाटील यांच्यात जुंपली!

## » शेतकऱ्यांची केळी पीकविमा रक्कम रखडली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जळगाव जिल्ह्यातील हजारो शेतकरी केळी पीक विम्याचा लाभ मिळालेला नसून यात आमदार चंद्रकांत पाटील यांचा हात असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला आहे. यावर चंद्रकांत पाटील यांनी आपण असे कोणतेही पत्र शासनाला दिले नसून उलट या प्रश्नासंदर्भात लक्ष घालण्याची विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदेकडे केल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.**

एकूणच केळी पीक विम्यासंदर्भात राष्ट्रवादी नेते एकनाथ खडसे आणि शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत असल्याचं पाहायला मिळत आहे. केळी पीकविम्यासंदर्भात आमदार



### चंद्रकांत पाटील नेमके काय म्हणाले?

» आमदार एकनाथ खडसे यांनी केलेला आरोप व पत्रकार परिषदेत दिलेली माहिती दिशाभूल करणारी असून, आपल्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा प्रत्यारोप आमदार चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.या संदर्भात आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले, की सुरवातीला चार हेक्टरवर शेती असल्यास त्या शेतकऱ्यांचा विमा नामंजूर होत होता. परंतु चार हेक्टरवरील जमीनधारक शेतकऱ्यांना अपात्र करू नका, अशी मागणी मी केली होती.

चंद्रकांत पाटील यांनी स्टींग ऑपरेशन केले, शासनस्तरावर प्रधान सचिव कृषी विभाग यांच्याकडे केलेल्या तक्रारीमुळे जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची केळी पीकविमा रक्कम रखडली असल्याचा आरोप आमदार एकनाथ खडसे यांनी आज येथे केला. मंत्री गिरीश महाजन यांनी जाहीर केल्याप्रमाणे बारा टक्के व्याजासह शेतकऱ्यांना रक्कम कधी मिळणार, असा प्रश्नही त्यांनी पत्रकार परिषदेत केला. एकनाथ खडसे म्हणाले की, जिल्ह्यात 1 लाख 10 हजार हेक्टर केळीची नोंदणी असून सॅटेलाईटच्या माध्यमातून 32 हजार हेक्टर केळीची नोंदणी झाली आहे तर कृषी अधिकारी यांच्या सर्वेक्षणातून 52 हजार हेक्टर नोंदणी झाली आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचा पीक विमा उतरविण्यात आला आहे, त्याच्या लागवड क्षेत्रामध्ये विसंगती असल्याचे म्हटल आहे. याच विषयाला धरून आमदार चंद्रकांत पाटील यांनी शेतकरी केळी न लावता कसा पीक विमा उतरवतो, दलाल पैसे घेऊन कसे पैसे कमवत आहेत, याची त्या वेळच्या तहसीलदारांसमवेत काही शेतकऱ्यांचं स्टिंग ऑपरेशन केले असल्याचा आरोप खडसे यांनी केला.

# राजकीय पक्ष महिलांमुळे घाबरले!

## » 30 वर्षांपासून प्रलंबित होते महिला आरक्षण : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या 42 व्या दौऱ्यावर शनिवारी वाराणसीत आहेत. येथील गांजरीतील जाहीर सभेनंतर ते संपूर्णानंद स्टेडियमवर नारी शक्ती वंदन-अभिनंदन कार्यक्रमाला पोहोचले. महिलांशी संवाद साधताना ते म्हणाले, "नारी शक्ती वंदन कायदाच घ्या. हा कायदा तीन दशकांपासून प्रलंबित होता. तुमच्या ताकदीमुळेच संसदेच्या दोन्ही सभागृहात अशा पक्षांना समर्थनार्थ यावे लागले, जे यापूर्वी तुम्ही आंदोलन करून खचले नाहीत.**

तुम्ही माता-भगिनींनो जागरूक आणि संघटित झाला आहात.त्यामुळेच भारतातील सर्व राजकीय पक्ष आता तुम्हाला घाबरत आहेत आणि थरथरत आहेत. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी हेलिकॉप्टरने विमानतळावरून गांजरी येथील जाहीर सभेच्या ठिकाणी पोहोचले. त्यानंतर उघड्या जीपमधून लोकांमध्ये गेले. शिवधामसारख्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमची पायाभरणी केली. पीएम मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात हर हर महादेवने केली. मग ते भोजपुरीमध्ये म्हणाले – आज मला पुन्हा बनारसला येण्याची संधी मिळाली आहे, जो आनंद बनारसमध्ये आहे तो इतरत्र कुठेही मिळत नाही. मोदी म्हणाले- हे स्टेडियम केवळ वाराणसीच्या तरुणांसाठीच नाही तर पूर्वांचलच्या तरुणांसाठीही वरदान ठरेल. तरुण प्रतिभा शोधणे आणि त्यांचे पालनपोषण



करणे महत्वाचे आहे. जेव्हापासून या स्टेडियमची छायाचित्रे समोर आली आहेत, तेव्हापासून प्रत्येक काशीवासीय त्यांना पाहून उत्साहित झाला आहे. हे स्टेडियम भगवान शिवाला समर्पित आहे. येथे एकाच वेळी 30 हजार लोकांना सामना पाहता येणार आहे. "आपला देश सुरुवातीपासूनच पुरुषप्रधान आहे. मात्र जेव्हापासून आपले सरकार स्थापन झाले आहे. खेळाच्या मैदानापासून ते राफेल उडवण्यापर्यंत महिलांना त्यांची क्षमता दाखवण्याची संधी मिळाली आहे. आम्ही मुद्रा योजना सुरू केली. याचा सर्वाधिक फायदा महिलांना झाला. जे छोटे-मोठे उद्योग बंद होणार होते, त्यांना पुन्हा गती मिळाली आहे. आज देशाच्या प्रगतीत महिलांचा मोलाचा वाटा आहे. त्या त्यांच्या कौशल्याने आपल्या क्षेत्रात नाव कमवत आहे. आज मी अशा दिवशी काशीत आलो आहे जेव्हा भारताच्या चंद्राच्या शिवशक्ती बिंदूवर आगमनाला एक महिना पूर्ण होत आहे. शिवशक्ती म्हणजे गेल्या महिन्याच्या 23 तारखेला आपले चांद्रयान जिथे उतरले ते ठिकाण. शिवशक्तीचे एक स्थान चंद्रावर आहे आणि दुसरे शिवशक्तीचे स्थान काशी येथे आहे. आज क्रिकेटच्या माध्यमातून जग भारताशी जोडले जात आहे. क्रिकेट खेळण्यासाठी नवे देश पुढे येत आहेत. साहजिकच आगामी काळात क्रिकेट सामन्यांची संख्या वाढणार आहे. जेव्हा सामन्यांची संख्या वाढेल तेव्हा नवीन स्टेडियमची गरज भासेल.

### कणात कणात मातृशक्तीची महिमा

» पीएम मोदी म्हणाले, "आपली काशी ही माता अन्नपूर्णा, माता कुष्मांडा, माता शृंगार गौरी आणि माता गंगा यांची पवित्र नगरी आहे. या स्थानाच्या प्रत्येक भागाला मातृशक्तीचा महिमा जोडलेला आहे. विद्यावासिनी देवीही वाराणसीपासून फार दूर नाही. काशी द. देवी अहिल्याबाई होळकर यांच्या पुण्य कर्तृत्वाचे आणि व्यवस्थापन कौशल्याचेही हे शहर साक्षीदार आहे. तुम्हा सर्वांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी काशीला आलो आहे, हे माझे भाग्य आहे.दुर्गापूजेचा उत्सवही काही वेळात सुरू होणार आहे. वाराणसीमध्ये ठिकठिकाणी पंडाळे उभारण्यात येणार आहेत.नारी शक्ती कायद्यामुळे दुर्गापूजेचा उत्सव अनेक पटींनी वाढला आहे.

# सरकारला इंडिया नाव बदलायचे होते!

## » जात जनगणना का करत नाहीत: राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसने राजस्थानात कार्यकर्ता संमेलनाने निवडणूक प्रचाराला सुरुवात केली आहे. जयपूर येथील संमेलनात काँग्रेसने केंद्रात सरकार आल्यास महिला आरक्षण त्वरित दिले जाईल, असे आश्वासन दिले. केंद्र सरकारला देशाचे नाव बदलायचे आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी परिषदेत केला. त्यांना भारताचे नाव बदलून भारत करायचे होते, म्हणूनच त्यांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले, पण ते थांबवून महिला आरक्षण विधेयक आणले.**

सर्व विरोधकांनी महिला आरक्षणाला पाठिंबा दिल्याचे ते म्हणाले. महिला आरक्षणाची आजपासूनच अंमलबजावणी व्हावी, अशी आमची इच्छा आहे, पण भाजपला ते 10 वर्षांनी लागू करायचे आहे. मोदींना ओबीसी



### इंडिया आणि भारत यांच्यात संघर्ष?

» राहुल गांधी म्हणाले की, मोदी सरकारला नाव बदलायचे आहे आणि त्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. इंडियाचे भारत केले, तर संविधानात इंडिया हा भारत आहे असे स्पष्टपणे लिहिलेले आहे. म्हणजे इंडिया हा भारत आहे. जेव्हा त्यांना वाटले की यातून काही फायदा होणार नाही आणि भारतातील जनतेने या सर्व गोष्टींना साथ दिली नाही, तेव्हा त्यांनी महिला आरक्षण विधेयक आणले.

प्रवर्गाला सहभाग द्यायचा आहे, पण ते जात जनगणनेला का घाबरतात? ते अदानींनाही घाबरतात. भाजपवाले मते मागायला आले तर त्यांना विचारा की जात जनगणना का करत नाहीत? काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले- 2024 मध्ये काँग्रेसचे सरकार आले तर आम्ही लगेच महिला आरक्षण देऊ. संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनाच्या वेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रित करण्यात आले नव्हते. हा राष्ट्रपतींचा अपमान आहे. त्या आदिवासी असल्यामुळे त्यांना निमंत्रित करण्यात आले नाही. यापूर्वी रामनाथ कोविंद राष्ट्रपती असताना त्यांना संसद भवनाच्या पायाभरणी समारंभाला आमंत्रित करण्यात आले नव्हते, कारण ते स्पृश्यास्पृश्यता मानतात. अस्पृश्यांचे आगमन होताच ते गंगाजलाने ती जागा धुतात. ते फक्त बोलण्यासाठी दलित-आदिवासींना प्रोत्साहन देण्याबाबत बोलतात. महिला आरक्षण विधेयकाला सर्व विरोधकांनी पाठिंबा दिल्याचे राहुल गांधी म्हणाले. महिला आरक्षणाची अंमलबजावणी दहा वर्षांत व्हावी, अशी भाजपची इच्छा आहे, तर आजपासूनच महिला आरक्षण लागू व्हावे, अशी आमची इच्छा आहे. जेव्हा मी संशोधन केले तेव्हा मला कळले की आपल्या संस्थांमध्ये ओबीसी, दलित आणि आदिवासी वर्गाचा सहभाग काय आहे? आजचा भारत 90 लोक चालवतात. आजचा भारत 90 अधिकाऱ्यांसह पंतप्रधान चालवत आहेत. ते प्रत्येक मंत्रालयाचे सचिव आहेत.

# गुजरातमध्ये हमसफर एक्स्प्रेसला आग!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील छिपवाडमध्ये हमसफर एक्स्प्रेस ट्रेनच्या जनरेटर बोगीला शनिवारी आग लागली. ही आग आजूबाजूच्या बोगींतही पसरली. प्रवाशांनी आग पाहिल्यानंतर चेंगराचेंगरी झाली. माहिती मिळताच ट्रेन थांबवून प्रवाशांना ट्रेनमधून उतरण्यास सांगण्यात आले. दुपारी 2 च्या सुमारास तिरुचिरापल्ली-श्रीगंगानगर हमसफर एक्स्प्रेस वलसाड स्थानकावरून सुरतच्या दिशेने निघाली होती तेव्हा ही घटना घडली. ओडिशाच्या बालासोर येथे शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातात 233 जणांचा मृत्यू झाला, तर 900 हून अधिक प्रवासी जखमी झाले. कोलकाता-चेन्नईकडे जाणारी कोरोमंडल एक्स्प्रेस आणि यशवंतपूर-हावडा एक्स्प्रेस (दुरांतो) बालासोरमधील बहनगाजवळ रुळावरून घसरली. यानंतर कोरोमंडल ट्रेन मालगाडीला धडकली.

ही धडक इतकी जोरदार होती की पॅसेंजर ट्रेनचे इंजिन मालगाडीवर चढले. 3 गाड्यांचे 15 डबे रुळावरून घसरले ओडिशातील बालासोरमध्ये २ जूनच्या सायंकाळी ६.५५ वाजता कोरोमंडल एक्स्प्रेस मालगाडीला धडकली व दुसऱ्या रुळावरून येणारी दुरांतो एक्स्प्रेस त्यांच्या डब्यांवर आडळली. या अपघातात २८८ लोकांचा मृत्यू झाला. तथापि, रविवारी ओडिशा सरकार म्हणाले, मृतांचा आकडा २७५ आहे. कारण चुकून काही मृतदेहांची गणना दोनदा केली होती.

अपघातात ११७५ लोक जखमी झाले. पैकी ७९३ जणांना उपचारानंतर घरी पाठवले. १८० पेक्षा अधिक मृतदेहांची अद्याप ओळख पटू शकली नाही. ओडिशातील तिहेरी रेल्वे अपघाताचा CBI तपास सुरू झाला आहे. मंगळवारी 6 जणांचे पथक अपघातस्थळी पोहोचले. त्यांनी बहनगा बाजार रेल्वे स्थानकालाही भेट दिली. तेथील सिग्नलिंग रूम, रेकॉर्ड रूम व अधिकाऱ्यांची चौकशी केली.

हिंदू धर्मात गणेश चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. हा सण दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला साजरा केला जातो. या उत्सवात सर्व देवतांमध्ये प्रथम पूजक असलेल्या श्री गणेशाला प्रसन्न करण्यासाठी त्यांची पूजा केली जाते यंदा गणेश चतुर्थी 19 सप्टेंबर 2023 रोजी साजरी होणार आहे. गणेश महोत्सवाची सुरुवात गणेश चतुर्थीपासून होते आणि हा उत्सव दहा दिवसांनंतर म्हणजेच अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जनासह संपतो. या 10 दिवसात 10 वेगवेगळ्या वस्तू गणपतीला अर्पण केल्या जातात. असे मानले जाते की या 10 वस्तू अर्पण केल्याने गणपती बाप्पा खूप प्रसन्न होतात. यामुळे कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदते. सर्व संकटे दूर होतात.

## ॥ गणपती बाप्पा मोरया ॥






गणपती बाप्पाला म्हणजेच गणपतीला मोदक अतिशय प्रिय आहेत. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच श्रीगणेशाच्या जयंतीला प्रथम मोदक अर्पण करावा.




गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गणपती बाप्पाला म्हणजेच गणपतीला मोतीचूर लाडू अर्पण करणे उत्तम.



गणेशोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी गणपती बाप्पाला म्हणजेच श्री गणेशाच्या पूजेत बेसन लाडू अर्पण करावेत.



सनातन धर्मात गणपतीला केळी अर्पण करणे श्रेष्ठ मानले जाते. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या पूजेच्या चौथ्या दिवशी केळी अर्पण करावी.



गणेश जन्मोत्सवाच्या पाचव्या दिवशी घरच्या घरी स्वादिष्ट माखणा खीर बनवा आणि भोग म्हणून अर्पण करा.



गणेश चतुर्थीच्या दिवशी पूजेच्या सहाव्या दिवशी गणपतीला नारळ अर्पण करा.



जयंतीच्या 7 व्या दिवशी गणेश पूजेत सुक्या मेव्याचे लाडू अर्पण करावेत.



दुधापासून बनवलेले कलाकंद गणेशाला अतिशय प्रिय आहे. पूजेत कलाकंद अर्पण करा.



केशरापासून बनवलेले श्रीखंड बाप्पाला भोग म्हणून अवश्य अर्पण करा.



गणपतीच्या पूजेच्या शेवटच्या दिवशी बाजारातून किंवा घरी बनवलेले विविध प्रकारचे मोदक अर्पण करा.

# या गोष्टी बाप्पाला करा अर्पण

# तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 टीम इंडिया

## ऑस्ट्रेलियाला पराभूत करून टीम इंडिया वनडे क्रमवारीत प्रथम

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडियाने प्रथमच क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये एकाच वेळी नंबर-1 स्थान मिळवले आहे. भारतीय संघाने एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा 5 विकेट्सने पराभव करून ही कामगिरी केली. या विजयासह टीम इंडियाने पाकिस्तानला मागे टाकले आणि वनडे क्रमवारीत नंबर-1 बनले. कसोटी आणि टी-20 च्या सांघिक क्रमवारीत हा संघ आधीच पहिल्या क्रमांकावर आहे.**



भारत तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 बनणारा दुसरा संघ ठरला. भारतापूर्वी, दक्षिण आफ्रिकेचा संघ ग्रीम स्मिथच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट 2012 मध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 बनला होता. मोहालीमध्ये ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर टीम इंडियाने आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत 116 अंक गाठले. संघाने 115 गुणांसह पाकिस्तानला मागे टाकले. भारताकडून झालेल्या पराभवानंतर ऑस्ट्रेलियाने 2 गुण गमावले, संघ आता 111 गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. भारताविरुद्धच्या मालिकेतील शेवटचे 2 एकदिवसीय सामने जिंकूनही ऑस्ट्रेलियाचा संघ नंबर-1 वर येऊ शकणार नाही, पण या स्थितीत पाकिस्तान नंबर-1 होईल आणि भारत नंबर-2 वर येईल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना 24 सप्टेंबरला इंदूरमध्ये आणि तिसरा सामना 27 सप्टेंबरला राजकोटमध्ये खेळवला जाईल. जर टीम इंडियाने शेवटच्या दोन सामन्यांपैकी एकही सामना जिंकला तर तो वनडे क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर राहील.

या स्थितीत भारताचे 116 गुण असतील तर पाकिस्तानचे 115 गुण असतील. भारताने शेवटचे दोन एकदिवसीय सामने जिंकण्यात यश मिळवले तर संघ पहिल्या क्रमांकावरील स्थान आणखी मजबूत करेल.

भारताने एकदिवसीय मालिका 3-0 ने जिंकल्यास 118 गुण होतील, तर पाकिस्तान 115 गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहील. या स्थितीत ऑस्ट्रेलिया 109 गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर असेल. टीम इंडिया वनडेसह टेस्ट आणि टी-20 या दोन्ही फॉरमॅटमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. संघाचे T-20 मध्ये 264 गुण आहेत, या फॉरमॅटमध्ये इंग्लंड 261 गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. टीम इंडिया 118 गुणांसह कसोटीत पहिल्या स्थानावर आहे. या फॉरमॅटच्या आयसीसी क्रमवारीत ऑस्ट्रेलिया संघाचेही 118 गुण आहेत, परंतु दशांश गणनेत भारताच्या मागे राहिल्याने संघ दुसऱ्या स्थानावर आहे. या वर्षी फेब्रुवारीमध्ये टीम इंडिया तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 बनली होती, पण ते आयसीसीच्या चुकीमुळे घडले. परिषदेने काही तासांतच चूक सुधारली. पण आता टीम इंडिया प्रथमच अधिकृतपणे तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 बनली आहे. दक्षिण आफ्रिका संघ ऑगस्ट 2012 मध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1 बनला होता. तेव्हा ग्रॅमी स्मिथ संघाचा कर्णधार होता, संघाने कसोटीत नंबर-1 बनून ही कामगिरी केली होती. वनडे आणि टी-20 मध्ये संघ आधीच नंबर-1 होता.

### भारत अव्वल स्थानावर कायम

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना 24 सप्टेंबरला इंदूरमध्ये आणि तिसरा सामना 27 सप्टेंबरला राजकोटमध्ये खेळवला जाईल. जर टीम इंडियाने शेवटच्या दोन सामन्यांपैकी एकही सामना जिंकला तर तो वनडे क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर राहील. या स्थितीत भारताचे 116 गुण असतील तर पाकिस्तानचे 115 गुण असतील. भारताने शेवटचे दोन एकदिवसीय सामने जिंकण्यात यश मिळवले तर संघ पहिल्या क्रमांकावरील स्थान आणखी मजबूत करेल. भारताने एकदिवसीय मालिका 3-0 ने जिंकल्यास 118 गुण होतील, तर पाकिस्तान 115 गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहील. या स्थितीत ऑस्ट्रेलिया 109 गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर असेल.

# व्हिसा विलंबामुळे पाकचा विश्वचषकपूर्व दुबई दौरा रद्द !

## पाकिस्तानने द्विपक्षीय मालिकेसाठी भारताचा दौरा केलेला नाही

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतातील एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी हैदराबादला पोहोचण्यापूर्वी पाकिस्तान क्रिकेट संघाची दुबईला जाण्याची योजना व्हिसाच्या समस्येमुळे रद्द करण्यात आली आहे. एका रिपोर्टनुसार, बाबर आझम आणि त्याच्या टीमने वर्ल्डकपपूर्वी टीम एकत्र करण्यासाठी दुबईला जाण्याची योजना आखली होती, पण तसे होऊ शकले नाही.**



पाकिस्तानी संघ अजूनही भारतात जाण्यासाठी व्हिसा मिळण्याच्या प्रतीक्षेत असल्याने ही योजना रद्द करावी लागली. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इतर नऊ संघांपैकी पाकिस्तान संघ हा एकमेव संघ आहे ज्याला अद्याप व्हिसा मिळालेला नाही. पाकिस्तान पुढील आठवड्यात संयुक्त अरब अमिराती (UAE) ला जाणार होता आणि २९ सप्टेंबर रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या सराव सामन्यासाठी हैदराबादला रवाना होण्यापूर्वी काही दिवस दुबईत राहणार होता. अहवालानुसार, पाकिस्तानी संघ आता पुढील आठवड्यात कराचीहून हैदराबादला रवाना होऊ शकतो. पाकिस्तानचा संघ २०१२-१३ नंतर प्रथमच भारत दौऱ्यावर येणार आहे. २०१२-१३ पासून दोन्ही देशांनी कधीही द्विपक्षीय मालिकेसाठी पाकिस्तान किंवा भारताला भेट दिली नाही. दोन्ही संघ फक्त आयसीसी किंवा मोठ्या स्पर्धांमध्येच एकमेकांसमोर येतात आणि त्रयस्त ठिकाणी. सध्याच्या पाकिस्तान संघातील केवळ दोनच खेळाडू याआधी २०१६च्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारत दौऱ्यावर आले आहेमात्र, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) सूत्रांनी पीटीआयला सांगितले की, खेळाडू इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयात असल्याने हा दुबई दौरा रद्द करण्यात आला आहे. भारतीय सरकारकडून व्हिसा मिळण्याची वाट पाहत आहेत." पीसीबीने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) उपस्थित केला आहे. सूत्रांनी सांगितले की, "पीसीबीने काल पासपोर्ट गोळा करण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांना इस्लामाबादला पाठवले होते, परंतु व्हिसाची प्रक्रिया अद्याप सुरू झाली नाही. यामुळे आम्हाला संघाचा दुबईचा दौरा रद्द करावा लागला. योग्य वेळी व्हिसा मिळाल्यास संघ २७ सप्टेंबरला दुबईमार्गे हैदराबादला पोहोचेल." या प्रकरणाशी परिचित असलेल्या अन्य एका सूत्राने सांगितले की, "योग्य तपासणी प्रक्रियेनंतर व्हिसा मंजूर केला जाईल. पाकिस्तानी पासपोर्ट धारकाला भारतीय व्हिसा देण्यासाठी गृह, परराष्ट्र आणि क्रीडा या तीन मंत्रालयांकडून मंजुरी घ्यावी लागते.

### पाकिस्तानी संघात फारसा बदल नाही

आशिया चषकात भारताविरुद्धच्या सुपर-४ सामन्यात दुखापत झालेला स्टार वेगवान गोलंदाज नसीम शाहची संघाला उणीव भासणार आहे. तो सामना अर्धवटसोडून मैदानाबाहेर गेला आणि त्यानंतर तो स्पर्धेतून बाहेर पडला. आता तो वर्ल्ड कपमध्येही दिसणार नाही. क्षेत्ररक्षण करताना सीमारेषेवर बसलेल्या त्याच्या खांद्याला दुखापत झाली. नसीमच्या जागी हसन अलीचा संघात समावेश करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व शाहीन शाह आफ्रिदीकडे असेल. त्याला हरिस रौफ, मोहम्मद वसीम ज्युनियर आणि हसन अली यांची साथ मिळेल. याशिवाय आशिया कपमध्ये खेळणाऱ्या पाकिस्तानी संघात फारसा बदल करण्यात आलेला नाही.